
लोकमत पू. पान क्र.१ दि. 17/05/2023




# मोबाइल चोरी करणारा आरोपी अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या इंदिरानगर झोपडपट्टीत दारांच्या कड्या तोडून मोबाइल चोरणारा त्याच झोपडपट्टीत राहणारा व रिक्षाचालक असल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी त्याला अटक करून ९ मोबाइल व पाच हजार रोख रक्कम जप्त केली आहे.

शनिवारी पहाटे नवघर येथील इंदिरानगर झोपडपट्टीत अमेश दत्ताराम जाधव, अल्ताफ शेख, कैलासनाथ श्यामसुंदर यादव व मुस्कीम नूरअली खान यांच्या घरांच्या कड्या तोडून ९ मोबाइल चोरले होते, तर त्याच दिवशी पहाटे राहुल हरिजन (वय २४) याच्या घराची कडी तोडून चोरट्याने मोबाइल चोरण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, राहुल यांना जाग आल्याने त्यांनी प्रतिकार करत पकडण्याचा प्रयत्न केला असता चोरटा पाच हजारांची रोख लुटून पळून गेला होता.

## सीसीटीव्हीची मदत

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आदी विविध मार्गांनी आरोपीचा शोध सुरु केला. त्यातूनच रिक्षा चालवणारा व इंदिरानगर भागातच राहणारा सराईत चोरटा विवेक तोरडे (वय २६) याला पोलिसांनी अटक केली. या आधी तोरडे याला अल्पवयीन असताना चोरीच्या गुन्ह्यात पकडले होते. मध्यंतरी त्याला लोकांनी चोरीच्या संशयवरुन पकडले. मात्र, त्याच्याकडे काही न सापडल्याने सोडून दिले होते.

# सराईत चोरट्यांकडून २७ मोबाइल, रिक्षा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरसह मुंबई, भिवंडी आदी भागातील बस प्रवासी तसेच वाटसरूंचे मोबाइल चोरणाऱ्या अट्टल चोरट्यांना काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीचे २७ मोबाइल व एक रिक्षा जप्त केल्याची माहिती पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली.

काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीत देव गोपी शर्मा (वय ३०, रा. न्यू समीर, जेसल पार्क, भाईंदर पूर्व) हे रात्री डॉन बॉस्को शाळेकडे जाणाऱ्या वळणावर आले असता रिक्षामधून आलेल्या तिघांनी शर्मा यांना, 'सही है वो,' असे बोलून त्यांच्या गालावर मारहाण करून त्याच्या खिशातील मोबाइल चोरी करून पळ काढला. काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर पोलिस पथकाला वेस्टर्न हॉटेलकडून हाटकेशकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक रिक्षा व त्यातील तिघे जण संशयास्पद आढळून आले. पोलिसांनी पाठलाग करून रिक्षा व त्यातील तिघांना पकडले. ते तिघेही भिवंडीचे राहणारे आहेत. इरशाद अब्दुल रौफ अन्सारी (३०), मोहसीन मेहमूद खान (२६) आणि शाहीद अख्तर अन्सारी (२७) अशी त्यांची नावे आहेत.



## ११ गुन्हे दाखल

- अटक शाहिद हा रिक्षाचालक, मोहसीन हा हमाल तर इरशाद हा मेस्त्री काम करीत असल्याचे सांगत असले तरी ते चोरटे आहेत.
- त्यांच्यावर पूर्वीचे ११ गुन्हे दाखल असून, पोलिस जप्त मोबाइल मालकांचा शोध घेत आहेत.
- मीरा भाईंदरसह घोडबंदर ते अंधेरी, मुलुंड, भिवंडी आदी भागांत बसमधील प्रवासी तसेच वाटसरूंचे मोबाइल ते चोरत असत. आरोपींकडून आणखी अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पुण्यनगरी पू. पान क्र.१

# गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

मीरा रोड : भाईंदर पूर्वेला असलेल्या अभिनव शाळेजवळ पान दुकानात गुटखा विक्री केली जात असल्यामुळे त्यामुळे गुटखा विक्री करणाऱ्या दोन पान टपरीवाल्यांवर अनैतिक मानवी वाहतूक शाखा भाईंदर यांनी कारवाई केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या साई सरिता बिल्डिंग, अभिनव शाळेजवळ असलेल्या पानाच्या टपरीवर गुटखा विक्री केली जात आहे. मौर्या पान गादी सेंटर, या ठिकाणी सतेन्दर मौर्या तसेच त्याच्या बाजूला असलेल्या बरकाती पान शॉपचा चालक रघू मिर्झा हे महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधित केलेला गुटखा, मिराज, रोकडा, शिखर, रजनीगंदा, विमल हे त्यांच्या पान टपरीवर बेकायदेशीररीत्या विक्री करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक शाखा भाईंदर यांना मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी छापा टाकला असता दुकानात गुटखा विक्री करत असल्याचे दिसून आले. मौर्या पान शॉपचा चालक सतेन्दर दयाराम मौर्या व रघू खस्ते मिर्झा यांच्याकडे हा प्रतिबंधित गुटखा कोणाकडून घेतला जातो, याबाबत विचारपूस केली असता बबलू खान (रा. हनुमान नगर फाटक रोड, भाईंदर पूर्व) याच्याकडून घेत असल्याचे सांगितले.

यातील आरोपी सतेन्दर दयाराम मौर्या (३८) व रघू खस्ते मिर्झा (३४) व पाहिजे आरोपी बबलू खान यांनी आपसात संगनमत करून प्रतिबंधित गुटखा मानवी शरीरास अपायकारक असलेला तसेच महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व पान मसाला मौर्या पान गादी तसेच बरकाती पानगादी अभिनव शाळेजवळ, भाईंदर पूर्व या ठिकाणी विक्री करत असताना मिळून आल्यामुळे त्या दोघांना अटक करण्यात आली आहे.

CS CamScanner

सकाळ पान क्र. 1 दि. 17/05/2023

## भीतीचे वातावरण तयार करू नका!

# सर्वोच्च न्यायालयाकडून 'ईडी' धारेवर

नवी दिल्ली, ता. १६ (वृत्तसंस्था) : सर्वोच्च न्यायालयाने आज सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) धारेवर धरताना देशामध्ये भीतीचे वातावरण तयार करण्यात येऊ नये, असे सुनावले. राज्यातील कथित दोन हजार कोटींच्या मद्य गैरव्यवहारामध्ये मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचे नाव गोवण्यासाठी तपास संस्थेकडून एकतर्फी कारवाई केली जात असल्याचा युक्तिवाद राज्य सरकारकडून आज सर्वोच्च न्यायालयात करण्यात आला. न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेत तपास संस्थेलाच सुनावले.



न्या. एस. के. कौल आणि न्या. ए. अमानुल्लाह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. 'ईडी'कडून आम्हाला धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप उत्पादन शुल्क विभागातील विविध अधिकाऱ्यांकडून केला जात असून त्यांच्या काही नातेवाईकांना अटकही करण्यात आली आहे. या प्रकरणामध्ये मुख्यमंत्र्यांना गोवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अनेक अधिकाऱ्यांनी तर संबंधित विभागामध्येही काम करण्यास नकार दिला असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आले. ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी राज्य सरकारच्या बाजूने युक्तिवाद केला. सध्या राज्यात जे काही सुरू आहे ते धक्कादायक असून आता निवडणुका येत असल्याने हे सगळे होत आहे, असे निरीक्षण कोर्टाकडून नोंदविण्यात आले. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी 'ईडी'च्या वतीने युक्तिवाद केला. या गैरव्यवहाराचा 'ईडी'कडून तपास होत असल्याच्या दाव्याचे त्यांनी खंडन केले. तपास संस्था अशा पद्धतीने वागायला लागतात तेव्हा खऱ्या गोष्टींबाबतही साशंकता निर्माण होऊ लागते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### कायदेशीर तरतुदींना आव्हान

मागील महिन्यामध्येच छत्तीसगड सरकारने मनी लाँड्रिंग प्रतिबंधात्मक कायद्यातील (पीएमएलए) काही तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले होते. त्याच तरतुदींचा वापर करून तपास संस्था इतरांना जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचे राज्य सरकारने म्हटले होते. राज्यघटनेतील १३१ व्या कलमांतर्गत येणाऱ्या कायद्यातील तरतुदींना छत्तीसगड सरकारने थेट सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्याबाबत मूळ खटला दाखल केला आहे.

सकाळ पु. पान क्र.3

# रुग्णालयासाठी आंदोलनाचा इशारा

## नवघरमधील बांधकाम सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र

विरार, ता. १६ (बातमीदार) : नवघर येथे जिल्हा परिषदेचे आरोग्य केंद्र असून त्या ठिकाणी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर झाले आहे. मात्र हा प्रश्न २०१४ पासून प्रलंबित आहे. या रुग्णालयाचे बांधकाम आणि निधी मंजुरीसाठी २०१९ मध्ये मान्यता देण्यात आली. या रुग्णालयाचे काम सुरू झाले नसल्याने ते तातडीने सुरू करण्याची मागणी ठाकरे गटाचे वसई तालुकाप्रमुख राजाराम बाबर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. हे काम त्वरित सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.



वसई तालुका हा मुंबई शहराला लागून असला तरी याठिकाणी एकही सरकारी रुग्णालय नाही. त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागते किंवा मुंबईला जावे लागत आहे. रुग्णालय बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे. निधीही मंजूर झाला असतानाही अजूनपर्यंत बांधकाम सुरू न झाल्याने, तसेच इमारतीच्या बांधकामाबाबत उशीर होत आहे. इमारतीचे लवकर बांधकाम सुरू करावे, असे आदेश आरोग्य सेवेचे उपसंचालक हेमंतकुमार बोरसे यांनी पालघर जिल्हा शल्यचिकित्सक यांना २०१९ मध्ये दिले होते.

गेल्या चार वर्षांत या रुग्णालयाची एकही वीट रचण्यात आली नाही. त्यामुळे हे बांधकाम कोण लांबवत आहे, याचा शोध घेण्याचे आवाहन बाबर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना केले आहे. या मागणी संदर्भात विरोधी पक्ष नेते अजित पवार, अंबादास दानवे, आमदार हितेंद्र ठाकूर यांनाही निवेदनाची प्रत पाठवण्यात आली.

CamScanner

सकाळ पान क्र.4 दि. 17/05/2023

# परमबीर यांना फडणवीसांची बक्षिसी!

## पटोलेंची टीका : कायदेशीर प्रक्रियेचे पालन न केल्याचा आरोप

मुंबई, ता. १६ : 'अँटिलिया' स्फोटकांचा कट रचून तसेच महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांवर १०० कोटींच्या वसुलीचे खोटे आरोप करून महाविकास आघाडी सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र आता उघडे पडल्याचे सांगत, मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमबीरसिंग हे उपमुख्यमंत्री फडणवीसांच्या हातचे बाहुले होते. हे स्पष्ट झाले आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज केली. परमबीरसिंग यांनी केलेल्या मदतीची परतफेड म्हणून शिंदे-फडणवीस सरकारने कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता निलंबन रद्द करून पुन्हा सेवेत येण्यासाठी त्यांना मदत केली आहे, असा टोलाही पटोले यांनी यावेळी लगावला.

या संदर्भात बोलताना पटोले म्हणाले की, कॅटच्या आदेशामध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयला चौकशी करून आरोपपत्र दाखल करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. तसेच परमबीरसिंग यांची विभागीय चौकशी करा. पण शिंदे-फडणवीस सरकारने ते केले नाही.

परमबीरसिंग यांना निलंबित केले होते पण त्यांच्या निलंबनाचा दर तीन महिन्यांनी आढावा घेऊन निलंबनाला मुदतवाढ देणे आवश्यक होते. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारने ना परमबीरसिंगांची विभागीय चौकशी केली ना त्यांच्या निलंबनाला मुदतवाढ दिली. त्यामुळे कॅट न्यायाधिकरणासमोर झालेल्या सुनावणीत राज्य सरकारच्या भूमिकेमुळे परमबीरसिंगांना दिलासा मिळाला.

### भ्रष्टाचाराची पंतप्रधान कार्यालयाला कल्पना

आपण विधानसभा अध्यक्ष असताना दिल्ली येथे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटलो त्यावेळी त्यांनी परमबीरसिंग यांच्या भ्रष्टाचाराबाबतची फाइल आपल्याकडे काही जणांनी दिल्याचे सांगितले होते. त्या फाईलची एक प्रत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनाही संबंधिताने दिल्याचे ते म्हटले होते. यानंतर परमबीरसिंग मला भेटायला आले होते. त्यावेळी याबाबत मी स्वतः त्यांना विचारले असता त्यांनी आमच्या खात्यात असे चालते असे उत्तर दिले होते. यावरून परमबीरसिंग यांच्या भ्रष्टाचाराची संपूर्ण माहिती पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री आणि लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयाला असूनही त्याची साधी चौकशीही भाजप सरकारने केली नाही, असा गौप्यस्फोट पटोले यांनी केला.

पुढारी पान क्र.5

# घरफोडी करणाऱ्यासह घरफोडीचा बनाव करणाऱ्या दोघांना अटक

**मिरारोड :** माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या आरोपीबरोबर मिळुन घरफोडीचा बनाव करणाऱ्या कटाचा उलगडा करून गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी अटक केली आहे. माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत संजेरी अपार्टमेंट, विशाल नगर, वसई पश्चिम येथे राहणाऱ्या सौ. निकहत असगर खान (३८) यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील १० लाख ३० हजार रू किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेले आहेत. अशा दिलेल्या तक्रारीवरून माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्याची माहिती प्राप्त होताच गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्ह्याचा तपास सुरू केला. घटनास्थळाच्या बिल्डींगमधील सी. सी. टी. व्ही. कॅमेऱ्याचे फुटेजची पडताळणी करून आरोपीचे फुटेज प्राप्त केले. त्या माहितीच्या आधारे आरोपीची नावे निष्पन्न करून त्यास अटक करण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करून शोध मोहीम सुरु करण्यात आली. या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद कमर रौफ खान (२८) याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडे केलेल्या चौकशीतून त्याने गुन्हा हा त्याचा साथीदार मित्र आरोपी नसीम मोईन खान (४०) याच्या मदतीने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपी नसीम मोईन खान याला काशिमिरा येथून ताब्यात घेण्यात आले. अटक आरोपी यांच्याकडे केलेल्या तपासामध्ये या गुन्ह्यातील फिर्यादी निकहत असगर खान हीने तिच्या पतीने परदेशातुन वेळोवेळी पाठविलेली रक्कम तिच्याकडुन खर्च केली होती. त्यामुळे पती परत आल्यानंतर त्यास खर्च झालेल्या रकमेबाबत काय सांगायचे असा तिला प्रश्न पडला होता. त्यावेळी तिने तिच्या बिल्डींगमध्ये राहणारा तिच्या ओळखीचा इसम नसीम मोईन खान याचेशी संगनमत करून हा घरफोडी चोरीचा बनाव केला. चोरी केल्यानंतर ते सोन्याचे दागिने फिर्यादी यांनी त्यांच्या भावाचे घरी येथे लपवुन ठेवले असल्याची माहिती निदर्शनास आली. त्यानुसार सदर गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकुण १०,३०,००० रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन जप्त करण्यात आला आहे.

पुढारी पु.पान क्र.4

# स्पेलिंग येत नसल्याने शिक्षिकेची सहा वर्षांच्या मुलाला मारहाण

## शिक्षिकेविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**



भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या सहा वर्षाच्या मुलाला इंग्रजी स्पेलिंग येत नसल्याने एका खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षिकेने मुलाला बेदम मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात या शिक्षिकेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर परिसरात सहा वर्षाचा मुलगा राहतो. हा मुलगा भाईंदर पश्चिम येथील एका खाजगी शाळेत सिनियर केजीमध्ये शिकत आहे. त्याचे इंग्रजी कच्चे असल्यामुळे व आता शाळेला सुट्टी असल्यामुळे त्याचे पालकांनी त्याला गणेश देवल नगर परिसरात असलेल्या प्रतिमा प्रजापती हिच्याकडे इंग्रजी शिकवण्यासाठी पाठवले होते. ११ मे रोजी सकाळी ९ वाजता तो नेहमीप्रमाणे शिकवणी वर्गात गेला होता. मात्र साडेदहा वाजता तो रडत घरी आला. शिक्षिकेने संडे आणि मंडे याचे इंग्रजी स्पेलिंग न आल्याने काठीने हातावर, पाठीवर आणि डोक्यावर बेदम मारहाण केल्याचे सांगितले. त्याच्या डोक्यावर मारामुळे इजा झाली होती. त्याच्यावर भाईंदरच्या भीमसेन जोशी रुग्णालयात उपचार करण्यात आले. पालकांनी आपल्या मुलाची परिस्थिती पाहता अमानुषपणे मारहाण केल्याचे निदर्शनास आले.त्यांनी तात्काळ भाईंदर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून संबंधित शिक्षिका प्रतिमा प्रजापती हिच्याविरोधात तक्रार दिली. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी या शिक्षिकेविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंदराव पाटील यांनी दिली आहे.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 3 दि. 17/05/2023

# रस्ते अपघातांत २२ जणांचा बळी

## मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वर्षभरात ५७ अपघात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महामार्ग आणि शिरसाड-अंबाडी मार्गावर सातत्याने अपघातांच्या घटना घडत आहेत. वर्षभरात या दोन्ही मार्गांवर ५७ अपघात घडले असून, त्यात २२ जणांचा मृत्यू झाला आहे.

विरार पूर्व भागात मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत वर्षभरापूर्वी मांडवी पोलीस ठाण्याची स्थापना करण्यात आली. मांडवी, चांदीप, खारडी, चंदनसार, काशिदकोपर, मेढा, तिल्हेर, कन्हेर, सकवार, भारोड, बावखळ, असे या पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र आहे. या भागातून गेलेला महामार्ग व शिरसाड-अंबाडी या मार्गावर वाहनांची प्रचंड वर्दळ सुरू असते. विविध कारणांमुळे सातत्याने रस्ते अपघातांचा घटना घडत आहेत.

वर्षभराच्या कालावधीत या ठिकाणच्या रस्त्यांवर अपघातांच्या ५७ घटना घडल्या आहेत. यात २२ जणांचा मृत्यू झाला आहे, १८ जण गंभीर जखमी झाले आहेत, तर १७ जण किरकोळ जखमी झाले असल्याची माहिती मांडवी पोलिसांनी दिली आहे.

शिरसाड-अंबाडी महामार्गावर होणारे बहुतांश अपघात हे वाहनचालकांच्या चुकीमुळे झाले आहेत. अति वेगाने वाहने चालविणे, वाहतूक नियमांचे पालन न करणे, असे प्रकार घडत असल्याचे पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी सांगितले. वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, असे आवाहनही वाघ केले आहे.



### शिरसाड-अंबाडी महामार्ग धोकादायक

शिरसाड-अंबाडी या मार्गावर मागील काही वर्षांत वाहनांची वर्दळ प्रचंड प्रमाणात वाढली आहे. जड-अवजड वाहनेही भरधाव वेगाने जात आहेत. आधीच हा रस्ता अरुंद असून काही ठिकाणी वळणाचा आहे. त्यामुळे वाहनचालकांना धोकादायक प्रवास करावा लागत आहे. भरधाव वाहनांमुळे आजूबाजूच्या गावांतील ग्रामस्थांना रस्ता ओलांडताना अडचणी येत आहेत. यासाठी या रस्त्याची रुंदी वाढवून जागोजागी पांढरे पट्टे, मार्गदर्शक पट्टे मारण्यात यावेत, अशी मागणी येथील ग्रामस्थ सातत्याने करीत आहेत.

# विरारमधील आणखी दोन अनधिकृत शाळांविरोधात गुन्हे दाखल

## शिक्षण विभागाचा बडगा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या शिक्षण विभागाने विरारमधील आणखी दोन अनधिकृत शाळांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. या शाळांच्या व्यवस्थापनांना शाळा बंद करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही या शाळा सुरू असल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत शाळा सुरू आहेत. शिक्षण विभागाची परवानगी न घेताच सर्रासपणे शाळा चालू आहेत. यात विद्यार्थी व पालक यांची फसवणूक होत आहे. या अनधिकृत शाळांना आळा घालण्यासाठी यंदाच्या वर्षी शिक्षण विभागाने चांगलीच कंबर कसली आहे. काही दिवसांपूर्वी वसईच्या शिक्षण विभागाने ११ अनधिकृत शाळांविरोधात गुन्हे दाखल केले होते. आता विरारमधील 'भावधारा अकादमी इंग्लिश स्कूल'चे संचालक देवी पिसराणी आणि 'लिटल एंजल स्कूल'चे संचालक विजया कुमा यांच्यावर ४२० आणि १८८ कलमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शासनाची परवानगी न घेताच या अनधिकृत शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. याबाबत त्यांना द्रव्यदंड भरून अनधिकृत शाळा बंद करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, तरीही व्यवस्थापनांनी शाळा सुरू ठेवून विद्यार्थ्यांची फसवणूक सुरू ठेवली होती.

याबाबत विस्तार अधिकारी शंकर कोला यांनी विरार पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर या दोन अनधिकृत शाळाचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या वर्षात पालिकेने आतापर्यंत ४१ अनधिकृत शाळांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र.1

दि. 17/05/2023

# सोपारा पश्चिमेकडील गावांना पुराचा धोका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सोपारा पश्चिमेच्या गावातून पाणी वाहून नेणाऱ्या नैसर्गिक नाल्यावर अतिक्रमण करून भराव करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे नाल्याची रुंदी कमी झाली असून येथील गावांना पुराचा धोका निर्माण झाला आहे.

नालासोपारा पश्चिमेच्या सोपारा येथील उमराळे, नाळे, गुराडे, कोराडी आदी गावातील सांडपाणी तसेच पाणी वाहून जाण्यासाठी शेकडो वर्षांपूर्वीचा जुना नाला आहे. हा नाला ३ मीटर लांबीचा असून तो बोळिंज सोपारा हा रस्त्याच्या बाजून



राज रिसॉर्ट डांगे परिसराच्या मार्गातून श्रीप्रस्थ येथील खाडीला मिळतो. कितीही पाऊस पडला तरी गावांमध्ये पावसाचे पाणी साचून रहात नाही आणि घरे तसेच शेती सुरक्षित राहते. मात्र या नाल्यावर अतिक्रमण करून त्याची रुंदी कमी करण्यात आल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले. राज रिसॉर्ट तसेच येथील लिटिल फ्लॉवर शाळेने भरणी करून, पत्रे मारून नाल्याची रुंदी कमी केली आहे. यामुळे पावसात पाणी वाहून जाण्याचा मार्गच बंद झाला आहे.

मंगळवारी ग्रामस्थांनी पालिकेचे अभियंते आणि आरोग्य निरीक्षक यांना घेऊन पाहणी केली. करोनाकाळात हा भराव आणि अतिक्रमण करण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या नाल्यात भराव केल्याने सुमारे तीन मीटरचा हा नाला आता केवळ जेमतेम एक मीटर एवढा झाला आहे. त्यामुळे गावातील घरात पाणी शिरून शेतीचेही नुकसान होणार आहे. आम्ही पालिकेला एक आठवड्याची मुदत दिली आहे. जर पालिकेने ही अतिक्रमम काढून नाला मोकळा केला नाही तर ग्रामस्थांच्या वतीने उग्र आंदोलन केले जाईल, असा इशारा स्थानिक रहिवाशी आणि माजी प्रभाग समिती सभापती नीलेश देशमुख यांनी दिला आहे.

# वसई स्थानकातील वळणमार्ग धोकादायक

## पूल आणि बस थांबे काढून रस्ता मोकळा करण्याची गरज

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई पश्चिमेच्या नवघर बस आगारात जाण्यासाठीचा रस्ता निमुळता असून आकाशमार्गिकेचा पूल, वाहनतळ आणि वापरात नसलेला बस थांबा आहे. त्यामुळे बस निमुळत्या जागेतून वळवावी लागते आणि अपघात होण्याची शक्यता असते. या ठिकाणी असलेला आकाशमार्गिकेचा पूल आणि विनावापर असलेले थांबे काढल्यास रस्ता मोकळा करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### पूल आणि थांबे काढण्याची मागणी

बसला वळण घेण्यास पुरेशी जागा मिळाल्यास हा प्रश्न सुटू शकणार आहे. यासाठी स्कायवॉकचा पूल अन्यत्र हलवावा, तसेच वापरात नसलेले थांबे काढून टाकल्यास मोकळी जागा होईल आणि बस सहज वळण घेऊ शकेल, असे ऑल इंडिया कन्झ्युमर फोरमचे सरचिटणीस शंकर बने यांनी सांगितले. यासंदर्भात त्यांनी पालघर बस आगाराकडे पत्र पाठवून हा मार्ग सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. याच मार्गावर महामंडळाने दुचाकीचे वाहनतळ सुरू केले आहे. ते काढल्यास संपूर्ण रस्ता मोकळा होऊ शकेल, असेही त्यांनी या पत्रात म्हटले आहे.



वसई पश्चिमेला रेल्वे स्थानकाला लागून राज्य परिवहन महामंडळाचे (एसटी) नवघर बस आगार आहे. लांब पल्ल्याच्या गाड्या या आगारातून सुटतात. रेल्वे स्थानकातून निघणाऱ्या प्रवाशांची गर्दी या रस्त्यावरून येत असते. त्यामुळे बस वळवताना बसचालकाला मोठी कसरत करावी लागते. सोमवारी रात्री एक बस वळण घेत असताना मंदा मेहेर या महिलेला जोरदार धडक दिली. ही महिला गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. या एसटीचा हा वळण मार्ग (टर्निंग रोड) नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे.

ही जागा एसटी महामंडळाची आहे. त्यांनी पालिकेच्या परिवहन बसनादेखील आत येण्यासाठी परवानगी नाकारली आहे. त्यामुळे पालिकेच्या बसेस रस्त्यातूनच वळण घेतात आणि वाहतूककोंडी वाढत असते.

लोकसत्ता पू. पान क्र.3

# ट्रॅक्टर चोरीप्रकरणी तिघे ताब्यात

**मांडवी पोलिसांची कामगिरी**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** खानिवडे येथील शेतकऱ्याचा चोरीला गेलेला ट्रॅक्टर मांडवी पोलिसांनी गुजरात येथून शोधून काढला आहे. याप्रकरणी तलासरी परिसरातील तीन आरोपींना मांडवी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

खानिवडे येथील शेतकरी नारायण तरे यांच्या शेतात ठेवलेला पॉवर टिलर ट्रॅक्टर काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी चोरून नेला होता. याबाबत मांडवी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास मांडवी पोलीस करत असताना त्यांना खानिवडे टोलनाक्यावरील सीसीटीव्ही चित्रीकरणात एका गाडीतून ट्रॅक्टर नेण्यात येत असल्याचे दिसले. त्यानुसार पोलिसांनी त्याचा छडा लावत तलासरी भागातील रहिवासी असलेल्या तिघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी हा ट्रॅक्टर गुजरात परिसरात विकल्याची कबुली दिली. यात आणखी तीन आरोपी असून, लवकरच त्यांना जेरबंद करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

CamScanner

दि. 17/05/2023

लोकसत्ता पान क्र. 1

# आर्थिक गुन्हेगारांना आता 'विशेष ओळख'

**देशभरातील आरोपी व्यक्ती, कंपन्यांचा माहितीकोश तयार करण्याचा निर्णय; गुन्हेगारांच्या पॅन, आधारशीही जोडणी**

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** गेल्या काही वर्षांत आर्थिक गुन्हेगारीत भरमसाट वाढ होत असल्याने यावर वचक बसवण्यासाठी केंद्र सरकारने अशा गुन्ह्यांत अडकलेल्या व्यक्ती वा कंपन्या यांचा माहितीकोश (डेटाबेस) तयार करण्याचे ठरविले आहे. 'राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागा'च्या धर्तीवर 'राष्ट्रीय आर्थिक गुन्हे नोंद' असा हा माहितीकोश केंद्रीय आर्थिक गुप्तचर विभागामार्फत तयार केला जाणार आहे. त्यात गुन्हेगारांना विशेष ओळख क्रमांक देण्यात येणार असून ही माहिती त्यांच्या आधार, पॅन क्रमांकांशीही जोडण्यात येईल.

केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या केंद्रीय आर्थिक गुप्तचर विभागाने आतापर्यंत अडीच लाख आर्थिक गुन्हेगारांचा तसेच *(पान २ वर)*

# आर्थिक गुन्हेगारांना आता 'विशेष ओळख'

*(पान १ वरून)* कंपन्यांचा तपशील गोळा केला आहे. या तपशिलाच्या आधारे 'राष्ट्रीय आर्थिक गुन्हे नोंद'(न्यूओर) असा माहितीकोश तयार केला जाणार आहे. यासाठी नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटरच्या माध्यमातून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. येत्या चार ते पाच महिन्यांत हा माहितीकोश तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशातील केंद्रीय यंत्रणा तसेच राज्यातील तपास यंत्रणांमध्ये दाखल झालेल्या आर्थिक गुन्ह्यांची नोंद आपसूकच होणार आहे.

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग, सक्तवसुली महासंचालनालय, सीमाशुल्क विभाग, प्राप्तिकर विभाग, महसूल गुप्तचर महासंचालनालय, वस्तू व सेवा कर - गुप्तचर, गंभीर आर्थिक गुन्हे तपास विभाग तसेच राज्यातील आर्थिक गुन्हे विभाग आपसूकच या माहितीकोशाशी जोडले जाणार आहेत. आर्थिक गुन्हेगाराचा आधार क्रमांक वा कंपनीचा पॅन क्रमांक दाखल करताच संबंधितांवरील आर्थिक गुन्ह्यांची संपूर्ण माहिती तात्काळ उपलब्ध होणार आहे.

### कुठूनही माहितीकोशाचा वापर शक्य

केंद्रीय आर्थिक गुप्तचर विभागाने देशातील तसेच राज्यातील विविध तपास यंत्रणांकडे दाखल असलेल्या ५६ हजार ९०० गुन्ह्यांवरून गंभीर आर्थिक गुन्हे करण्यात सराईत असलेल्या साडेआठ हजार गुन्हेगारांचे डॉसिअर तयार केले आहे. राष्ट्रीय आर्थिक गुन्हे नोंदीमुळे ही माहिती आता सहजगत्या उपलब्ध होणार असल्याचा दावा या घडामोडीशी संबंधित सूत्रांनी केला.

'क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टिम'मुळे (सीसीटीएनएस) देशभरातील पोलीस ठाणी एकमेकांना जोडली गेली आहेत. देशात कुठेही गुन्हा दाखल झाला की, प्राथमिक निष्कर्ष अहवाल (एफआयआर) सर्व तपास यंत्रणांना आता पाहता येतो. आता आर्थिक गुन्ह्यांची स्वतंत्र नोंद होऊन आर्थिक गुन्हेगारांचा माहितीकोश निर्माण केला जाणार आहे.

CamScanner

दि. 17/05/2023

लोकसत्ता पु.पान क्र.1

# वाहनचालकांचा अडीच कोटींचा दंड थकीत

## ऑनलाइन दंड भरण्याकडे वाहनचालकांची पाठ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**थकीत दंड**

**वसई वाहतूक विभाग**

२०२२ ते मे २०२३ पर्यंत १७ हजार ३७६ कारवाया

१ कोटी ३१ लाख २५ हजार ९५० थकीत दंड

**विरार वाहतूक विभाग**

२०२२ ते मे २०२३ पर्यंत २० हजार ७१५ कारवाया

१ कोटी ३८ लाख ३७ हजार ५५० थकीत दंड

एकूण ३८ हजार ०९१ कारवाया

२ कोटी ६९ लाख ६३ हजार ५०० थकीत दंड



**वसई:** वसई, विरार शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी ई चलनाद्वारे कारवाई केली जात आहे. मात्र या कारवाईचा दंड भरण्याकडे वाहनचालक दुर्लक्ष करीत असल्याने दीड वर्षात सुमारे अडीच कोटीहून अधिकचा दंड थकीत आहे. आता वर्षानुवर्षे दंड थकीत ठेवणाऱ्या वाहनचालकांनी वाहने जप्त करण्याचा इशाराही वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन व बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वसई व विरार वाहतूक पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येत आहे. ई चलन प्रणाली कार्यान्वित झाल्यापासून ही कारवाई इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सुरू आहे. यासाठी वाहतूक पोलिसांनी इलेक्ट्रॉनिक यंत्र कारवाईला दिली आहेत. त्या यंत्राद्वारे जे वाहनचालक नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. कारवाईनंतर अनेक वाहनचालक या कारवाईचा दंड भरण्याकडे दुर्लक्ष करीत असतात. त्यामुळे कारवाईची रक्कम ही मोठ्या प्रमाणात थकीत आहे. २०२२ ते २०२३ या कालावधीमध्ये वसई वाहतूक शाखेने केलेल्या कारवाईत १७ हजार ३७६ वाहनचालकांच्या कारवाईचा सुमारे १ कोटी ३१ लाख २५ हजार ९५० इतका दंड थकीत राहिला आहे. विरार वाहतूक वाहतूक शाखेचा २० हजार ७१५ वाहनचालकांवरील कारवाईचा सुमारे १ कोटी ३८ लाख ३७ हजार ५५० इतका ई चलन दंड थकीत आहे. असा एकूण २ कोटी ६९ लाख ६३ हजार ५०० इतका दंड थकीत राहिला आहे. नाकाबंदी असताना त्यावेळी वाहने थांबवून दंडाची रक्कम शिल्लक आहे का याची तपासणी केली जाते. शिल्लक असेल तर ती रक्कम भरण्यास सांगितले जाते. याशिवाय काही प्रकरणे ही लोक न्यायालयाच्या समोरही ठेवली जातात त्यातून ही दंड वसूल करण्यासाठी प्रयत्न सातत्याने सुरू असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली आहे. ई चलन कारवाईमुळे दंड भरण्याची जबाबदारी वाहनचालकांवर सोपविण्यात आली आहे. मात्र काही चालक हे आकारण्यात आलेला दंड भरण्यास पुढे येत नाहीत. ज्यांची चलन दंडाची रक्कम जास्त झाली असल्याचे निदर्शनास येते त्यांच्यावर वाहन जप्तीची कारवाई केली जाणार आहे. ज्यांची दंडाची रक्कम थकीत आहे. त्यांनी दंड भरावा अन्यथा वाहन जप्तीच्या कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे. केवळ ऑनलाइन दंड न आकारता वाहने जप्त करण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी एका तरुणाची दुचाकी जप्त केल्याने त्याने पेट्रोलची टाकी उघडून ती पेटवून दिली होती. वाहतूक पोलिसाने नागरिकांच्या मदतीने आग विझविल्याने पुढील अनर्थ टळला होता.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र.1 दि. 17/05/2023

**तहसीलदार कार्यालयाकडून जुन्या गावांना कारवाईच्या नोटिसा**


# उत्तन येथील घरांवर कारवाईचे संकट

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** उत्तन येथील सरकारी जमिनीवर उभारण्यात आलेल्या हजारो बांधकामांना तहसीलदार कार्यालयाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यात बेकायदा असलेले बांधकाम त्वरित काढून टाकण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या ठिकाणी वर्षानुवर्षे राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मागील वर्षी ऑगस्टमध्ये राज्य सरकारने सर्वांसाठी घरे या योजनेत बेघरांनी निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमिनी तसेच गायरानाच्या जमिनींवर केलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेवर न्यायालयाने गायरान जमिनींवर झालेली सर्व अतिक्रमणे निष्कासित करण्याचे आदेश ऑक्टोबर २०२२ मध्ये दिले आहेत. या वर्षअखेर ही अतिक्रमणे हटवायची आहेत. त्यामुळे शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटवण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उत्तनमधील चौक, डोंगरी, भाटे बंदर, तसेच

**"आम्ही मच्छीमार कित्येक वर्षांपासून येथील स्थायिक भूमिपुत्र आहोत. त्यामुळे पालिकेमार्फत आमच्या गावाचे सर्वेक्षण व्हावे, याची देखील मागणी करत आहोत. काही वर्षांपूर्वीच आमचे बांधकाम नियमित करून देणार असल्याची घोषणा शासनाने केली होती. परंतु त्याकडे स्वतःच दुर्लक्ष करून कोणाच्याही नावे नोटिसा पाठवून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. -शर्मिला बगाजी, माजी नगरसेविका**



धावगी येथे असलेल्या शासकीय जमिनी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना अतिरिक्त तहसीलदारांनी नोटिसा बजावल्या आहेत.

यात शासकीय जमीन व गायरानावर झालेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार अथवा तरतुदीनुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीची कागदपत्रे अतिरिक्त तहसीलदार कार्यालयात नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांत सादर करण्यात यावीत असे सांगितले आहे.

याशिवाय ही कागदपत्रे नमूद कालावधीत सादर न केल्यास झालेले अतिक्रमण नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसांत काढून टाकावे व जमिनीचा ताबा महसूल विभागाकडे द्यावा. तसे न केल्यास हे अतिक्रमण शासकीय खर्चाने हटवण्यात येईल व त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, असे या नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे पिढ्यान पिढ्या राहणाऱ्या उत्तन येथील मच्छीमारांमध्ये या नोटिसीमुळे भीतीचे वातावरले असल्याचे दिसून येत आहे.

लोकसत्ता पृ. पान क्र.3

# ज्येष्ठ नागरिकाला २८ लाखांचा गंडा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

गुन्हे वृत्त

**वसई :** 'फेसबुक'वर एका तरुणीने मैत्री करून वसईतील ज्येष्ठ नागरिकाला २८ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात एका महिलेसह दोघा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसईतील भुईगाव येथील ६२ वर्षीय निवृत्त व्यक्तीला मागील वर्षी ८ एप्रिलला 'फेसबुक'वर आकृती नावाच्या तरुणीची रिक्वेस्ट आली होती. ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर त्यांची मैत्री झाली. या तरुणीने त्यांना महागड्या भेटवस्तू पाठवल्या आणि त्या बदल्यात काही रक्कम घेतली. नंतर मनी लॉण्ड्रींगचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

एक वर्षात ही तरुणी आणि तिच्या साथीदाराने तक्रारदाराकडून २८ लाख ८० हजार रुपये उकळले. आरोपी त्यांच्याकडे पैशांची मागणी करत होते. त्यामुळे त्यांनी वसई पोलिसांत तक्रार दिली. या तक्रारीवरून आकृती व रेव सुसेन ग्रीन यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वसईत आज मौन फेरी

**वसई :** श्रद्धा वालकरच्या मृत्यूच्या घटनेला एक वर्ष होत असल्याने वालकर कुटुंबीयांतर्फे तिला श्रद्धांजली वाहण्यासाठी मौन फेरी आयोजित करण्यात आली आहे. बुधवार, १७ मे रोजी दुपारी ४ वाजता संस्कृती अपार्टमेंट, जीजी महाविद्यालयाजवळ, वसई पश्चिम येथून ही फेरी काढण्यात येणार आहे.

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-332 मुंबई, बुधवार 17 मई 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# 15 वर्षों से डकैती के 3 एवं मोक्का के एक मामले में वांछित आरोपी सातारा से गिरफ्तार

**वसई:** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत मध्यवर्ती अपराध जांच शाखा की कार्रवाई में लगभग 15 वर्षों से डकैती के 03 एवं मोक्का के 01 मामलों में वांछित आरोपी को गिरफ्तार किया है। यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पो.नि.राहुल राख की टीम ने पाई है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 21 अगस्त 2008 में काशिदकोपर फाटा,मांडवी,विरार या स्थान पर रेखा काशिनाथ चौधरी (45) रहती है।वह एक रिहायशी मकान में सो रही थी,वहीं आरोपी टेचर बंडया काले और उसके साथियों ने आपस में सांठगांठ कर हाथ में लोहे की औजार लेकर,उसने शिकायतकर्ता के बंद दरवाजे को लात मारकर घर के दरवाजे के हैंडल व दरवाजे के हैंडल को तोड़ दिया और घर में घुस गया,शिकायतकर्ता व उसके पति को लोहे की रॉड से मारपीटा,उनके शरीर पर से 17,000 रुपये कीमती सोने के जेवरात जबरदस्ती छीन कर फरार हो गए थे,इस मामले में विरार थाने में आरोपी के ऊपर कलम 395, 397, 452, 342, मोक्का एक्ट के साथ धारा 3(1)(दो), 3(2), 3(4) के तहत केस दर्ज किया गया था।पुलिस ने बताया कि उक्त अपराध में वांछित आरोपी टेचर बंडया काले,निवासी-ललगुन,पुसेगांव, जिला सातारा,अपराध होने के बाद से सतारा नहीं मिला,वरिष्ठ ने अपराध में वांछित आरोपी की तलाश करने और उन्हें गिरफ्तार करने के लिए मार्गदर्शन और आदेश दिए थे।पुलिस के मुताबिक,गौरतलब है कि आरोपी टेचर बंडया काले और उसके साथी आपस में सांठगांठ कर विरार पुलिस स्टेशन की सीमा के भीतर लूट की कुल 3 वारदातों को अंजाम देकर फरार हो गए थे।लूट जैसे संगीन अपराध के आरोपी का अभी तक पता नहीं चल पाने के कारण पुलिस उपायुक्त (अपराध) अविनाश अंबुरे ने अपराध में पोस्ट वांटेड आरोपी को खोजने और गिरफ्तार करने की सलाह और मार्गदर्शन किया था।वरिष्ठों के निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार मध्यवर्ती अपराध शाखा को गुप्त मुखबिर के माध्यम से तथा तकनीकी विश्लेषण से प्राप्त सूचना के आधार पर उक्त आरोपी के बारे में सूचना प्राप्त हुई कि आरोपी सतारा जिले में है,तदनुसार,मध्यवर्ती अपराध शाखा के अधिकारी और कर्मचारी सतारा गए और टेचर बंडया काले,निवासी-मु.पो. ललगुन,ता.पुसेगांव,जि. सातारा से पकड़ा और विरार पुलिस के हवाले कर दिया है।

**नमुद आरोपी हा खालील गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.**

| आरोपीचे नांव | विरार पोलीस ठाणे गु.रजि.नंबर | भा.द.वि.सं.कलम |
|---|---|---|
| टेचर बंडया काळे, रा. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा | १. २१०/२००८ | ३९५, ३९७, ४५२, ३४२, सह मोक्का कलम ३(१)(दोन),३(२),३(४),३(५) |
| | २. १८४/२००८ | |
| | ३. १३४/२००८ | |
| | ४. स्पेशल केस नं ०३/२००९ | |
| | ५. स्पेशल केस नं ११/२०१२ | |

# अवैध रूप से बना डाले अभिनव शिक्षण मंडल के 99 सदस्य

**भायंदर:** आगरी समाज द्वारा स्थापित 51 वर्ष पुराने अभिनव शेतकरी शिक्षण मंडल संस्था विवादों में है। मंडल के तत्कालीन अध्यक्ष मोहन पाटील पर वर्तमान कार्यकारिणी ने भ्रष्टाचार, तथा अवैध रूप सदस्यों को सदस्यता देकर संस्थान को बट्टा लगाने का आरोप लगाया है। साथ इस शैक्षणिक संस्थान के अस्तित्व को बचाने का आवाहन पत्रकार परिषद के माध्यम से किया है। प्राप्त जानकारी के अनुसार भायंदर पूर्व में वर्ष 1972 में गोडदेव गांव के पास आगरी समाज द्वारा अभिनव शेतकरी शिक्षण



मंडल नामक शैक्षणिक संस्थान की स्थापना बना लिया। यह विवाद ठाणे के धर्मादाय आयुक्त कार्यालय से होते हुए उच्च न्यायालय और सर्वोच्च न्यायालय तक पहुंच गया।

सुप्रीम कोर्ट के आदेश के बाद इस संस्थान में दो अलग अलग मत पेटियों में कार्यकारिणी का चुनाव 29 अप्रैल 2023 को धर्मादाय उप आयुक्त के माध्यम से हुआ। जिसमें एक मत पेटी में मूल 489 सदस्यों के मत डाले गए तथा दूसरे पेटी में 99 नए सदस्यों के मत डाले गए ।सर्वोच्च न्यायालय ने इन 99 विवादित सदस्यों के सदस्यता की जांच के लिए उच्च न्यायालय अथवा सेशन

CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक : ०५६ | बुधवार १७ मे २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# मध्यंतरी गुन्हे अन्वेषण शाखेला यश; सातारा येथून १५ वर्षानंतर फरार गुन्हेगार पकडला

**वसई.** MBVV पोलीस आयुक्तालयांतर्गत मध्यवर्ती गुन्हे अन्वेषण शाखेच्या कारवाईत सुमारे १५ वर्षांपासून दरोड्याच्या ०३ आणि मोक्काच्या ०१ गुन्ह्यांमध्ये वॉन्टेड आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हे डीसीपी अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे अन्वेषण शाखेचे पो.कॉ.राहुल राख यांच्या पथकाला हे यश मिळाले आहे.अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने मंगळवारी दिली. पोलिसांनी सांगितले की, २१ ऑगस्ट २००८ रोजी रेखा काशिनाथ चौधरी (४५, रा. काशिदकोपर फाटा, मांडवी, विरार) या राहत्या घरात झोपल्या असताना आरोपी शिक्षक बंड्या काळे आणि त्याच्या साथीदारांनी परस्परांशी संगनमत करून विनयभंग केला. लोखंडी हत्याराने फिर्यादीच्या बंद दरवाजाला लाथ मारून घराच्या दरवाजाचे हँडल व दरवाजाचे हँडल तोडून घरात प्रवेश करून फिर्यादी व तिच्या पतीला लोखंडी रॉडने बेदम मारहाण करून त्यांच्या अंगावरील १७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले बळजबरीने हिसकावून फरार झाला. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध



कलम ३९५, ३९७, ४५२, ३४२, मोक्का कायद्याच्या कलम ३(१)(दोन), ३(२), ३(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांनी सांगितले की, सदर गुन्ह्यातील वॉंटेड आरोपी शिक्षक बंड्या काळे, रा.ललगुण, पुसेगाव, जि.याने मार्गदर्शन केले व अटक करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,अरोपी शिक्षक बंड्या काळे व विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकमेकांच्या संगनमताने एकूण ३ दरोड्याचे गुन्हे करून त्याचे साथीदार फरार झाले आहेत.जघन्य गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणे बाकी असल्याने पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांनी सल्ला व मार्गदर्शन केले होते. गुन्ह्यातील मोस्ट वॉंटेड आरोपींना शोधून अटक करा. वरिष्ठांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेला गुप्तचर व तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर आरोपी सातारा येथे असल्याची माहिती मिळाली. जिल्हा. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी सातारा येथे गेले आणि शिक्षक बंड्या काळे, रा. ललगुण, ता.पुसेगाव, जि. सातारा येथून पकडून विरार पोलिसांच्या ताब्यात दिले.

CamScanner

# ...पत्नी ने रची चोरी की जूठी साजिश

**प्रातःकाल संवाददाता**

**मुंबई।** वसई पश्चिम स्थित मानिकपुर पुलिस स्टेशन क्षेत्र में एक घर से चोरी के मामले में छानबीन करते हुए क्राईम ब्रांच यूनिट 2 की टीम ने दो चोर सहित लाखों के आभूषण और नकदी बरामद किया है।




बता दें कि वसई पश्चिम निवासी निकहत असगर (38) ने अपने घर चोरी होने की शिकायत दर्ज करायई थी। महिला ने पुलिस को बताया कि उसके घर से 10,30,000 के सोने के आभूषण व नकदी चोरी हो गए है। पुलिस ने अज्ञात चोर के विरुद्ध चोरी करने का मामला दर्ज कर जाँच पड़ताल शुरू किया। मामले की जांच क्राईम ब्रांच यूनिट 2 के पीआय शाहुराज रणवरे के नेतृत्व में उनकी टीम के एपीआय सुहाष कांबळे ,सागर शिंदे, मंगेश चव्हाण, संजय नवले,रमेश भोसले, महेश पागधर, चंदन मोरे, प्रशांत ठाकुर, जगदीश गोवारी,अमोल कोरे,दादा आडके, रमेश अलदर, सचिन पाटील, सुधीर नरळे आदि की अलग अलग टीम ने घटनास्थल के आसपास लगे सीसीटीवी फुटेज से चोर की पहचान की। चोर की पहचान होने के बाद पुलिस ने गुप्त सूचना व टेक्निकल सहायता से चोर मोहम्मद कमर रौफ खान को गौवंडी से हिरासत में लिया। उसे पूछताछ करने पर उसने चोरी करने की बात कबूली और अपने साथी की जानकारी दी, और पुलिस ने उसके साथी नसीम मोहीन खान को पकड़ लिया।

## हिसाब नहीं देन पाने के चलते रची साजिश

पुलिस ने चोरी करने का कारण पूछा तो महिला ने बताया कि पिछले कुछ सालों से उसका पति विदेश में रहता है और समय-समय पर पैसे भेजता था। लेकिन भेजे गए ज्यादातर रुपये फालूत खर्च हो गए थे। वह कुछ दिनों में वापस वसई लौटने वाला था। पति के आने पर रूपयों का हिसाब कैसे बताया जाए कि रुपये कहां खर्च हुए है। इस खर्च को छुपाने के लिए अपनी ही बिल्डिंग में रहने वाले नसीम मोहीन खान की मदद लेकर नसीम ने अपने एक दोस्त को झूठी चोरी करने के लिए तैयार किया। प्लान की मुताबिक दोनों उस बिल्डिंग में

CamScanner

मुंबई केसरी टाइम्स

# जबरन चोरी के ३ अभियुक्तों को गिरफ्तार कर २,९६,०००/- रुपये मूल्य के २७ मोबाइल व ऑटो रिक्शा जब्त, काशीमीरा थाना अपराध जांच दल का प्रदर्शन

काशीमीरा/अनिरूद्ध मिश्र. काशीमीरा थाना अन्तर्गत फरियादी का नाम देव गोपी शर्मा, आयु ३० वर्ष, रहिवासी कमरा नंबर ०८, ए विंग, न्यू समीर, जैसल पार्क, भायंदर पूर्व ०३.०५.२०२३ को रात लगभग १०:०० बजे जब वह डॉन बॉस्को स्कूल के रास्ते में था, ३ अज्ञात व्यक्ति एक रिक्शे से आए और फरियादी के गाल पर थप्पड़ मार दिया और उसकी



जेब से Redmi कंपनी का ५A मॉडल सिल्वर मोबाइल फोन जबरन छीन लिया। जिसके बाद फरियादी ने काशीमीरा पुलिस थाना में ३३२/२०२३, धारा ३९२, ३४ के तहत मामला पंजीकृत किया गया था.

अपराध जांच दल के अधिकारी और प्रवर्तक उक्त अपराध को उजागर करने के लिए , क्राइम प्रिवेंशन पेट्रोलिंग स्क्वाड की पेट्रोलिंग करते समय ऑटो रिक्शा नं. एम.एच. ०४ डी २४६७ को जब वह संदिग्ध रूप से दौड़ता पाया गया तो क्राइम स्क्वाड ने नामुद रिक्शा का पीछा किया

१) इरशाद अब्दुलरीफ अंसारी, उम्र ३०, व्यवसाय टाइल मिस्त्री, रहिवासी हामिद की चाल, नाला पार्क, दीवानशाह दरगाह के पीछे, भिवंडी, जिला ठाणे।

२) मोहसिन महमूद खान, उम्र २६ साल, पेशा ट्रांसपोर्टर, रहिवासी जैतुनपुरा, कोटगेट मस्जिद के पीछे, टी. भिवंडी, जिला ठाणे।

३) शाहिद अख्तर अंसारी, उम्र २७ साल, पेशा रिक्शा चालक, रहिवासी जैतुनपुरा, मंगल बाजार एकता होटल के सामने, भिवंडी, टी. भिवंडी, जिला ठाणे में जब उसके रिक्शा को जब्त कर तलाशी ली गई

एक काले बैग में विभिन्न कंपनियों के कुल २७ मोबाइल फोन मिले। तब उक्त मोबाइल फोन और ऑटो रिक्शा को जब्त कर लिया गया और अगले जांचकर्ता द्वारा पूछताछ की गई, तो यह पाया गया कि उनके कब्जे से मिले मोबाइल फोन में रेडमी कंपनी ५ ए मॉडल का सिल्वर रंग का मोबाइल फोन जो की जबरन चोरी कर लिया गया था। तथा बाकी मोबाइलों के संबंध में और पूछताछ की जा रही है। साथ ही आरोपी के कब्जे से बरामद ऑटो रिक्शा क्रमांक एमएच०४ डी २४६७ काशीमीरा थाना के जी.आर.नं. ३०९/२०२३ धारा ३७९ आईपीसी संख्या ३७९ चोरी हो गई है और उक्त रिक्शा आरोपी द्वारा चुराया गया है अर्थात् १) इरशाद अब्दुलरोफ अंसारी, २) मोहसिन महमूद खान और उन्हें ०३.०५.२०२३ को गिरफ्तार किया गया है।

प्रशांत गांगुर्दे आगे का संचालन कर रहे हैं तथा अपराध की जांच। गिरफ्तार आरोपि जबरन चोरी और वाहन चोरी के मामले में ऑन रिकॉर्ड अपराधी हैं। जयंत बजबाले, पुलिस उपायुक्त सर्किल ०१ , वरिष्ठ पुलिस निरीक्षक संदीप कदम, पुलिस निरीक्षक कुमार गौरव धडवाड (अपराध), सहायक पुलिस निरीक्षक के मार्गदर्शन में मीरा रोड मंडल के सहायक पुलिस आयुक्त विलास सनप प्रशांत गांगुर्दे, पुलिस उप निरीक्षक निखिल चव्हाण, पुलिस उप निरीक्षक (रेंज) प्रकाश कावरे, पो ह सचिन हुने, सुधीर खोट, राहुल सोनाक पी.एम. रवींद्र कांबले, प्रवीन तोबारे सभी कश्मीरी थाने तैनात हैं। जयप्रकाश पी.यू. थाना कार्यालय,की ओर से उक्त

CamScanner